**तरुण भारत**

रविवार दि. २९ मार्च २०१५


# दुर्मीळ खजिन्यावर घाला घालण्याचे काम!

## पर्यावरणतज्ज्ञ प्राचार्य बाचोळकर यांचा आरोप : शासनाचे कायदे पर्यावरण नष्ट करणारे!

**झाडांची होते कत्तल...!**

- पर्यावरण वाचविण्यासाठी नागरिकांनीच प्रयत्न करावेत!
- दोडामार्ग महाविद्यालयात पर्यावरणावर राष्ट्रीय चर्चासत्र


प्रतिनिधी

दोडामार्ग


पश्चिम घाट हा कोकणाच्या नव्हे तर मानवजातीच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून या घाटात जमातील दुर्मीळ गोष्टींचा खजाना आहे. मात्र, या खजान्यावरच पद्धतशीरपणे घाला घालण्याचे काम सुरू असून त्यातून मानवजातच उध्वस्त होण्याची दाट शक्यता आहे. मायनिंगमुळे लोकांना रोजगार नव्हे तर पर्यावरणाचा ऱ्हास होणार असून नागरिकांनीच याचा अभ्यास करून पर्यावरण वाचविण्याचा प्रयत्न केला तर होणाऱ्या संहारापासून आपण वाचणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ व गाडगीळ समितीमधील सदस्य प्राचार्य मधुकर बाचोळकर यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय पर्यावरण चर्चासत्रात ते बोलत होते. प्रा. बाचोळकर पुढे म्हणाले, शासनाची पर्यावरणाबाबत असणारी निती चुकीची असून असणारे कायदे हे पर्यावरण वाचविण्यासाठी नव्हे तर त्याचा नाश करण्यासाठी वापरण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनासाठीची योजना १९८५ मध्ये जाहीर होऊनही आजपर्यंत त्याचा अध्यादेश निघालेला नाही. असा आरोप करत त्यांनी असे सरकार पर्यावरणाचे संवर्धन कसे करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शासनकर्त्यांनी त्याकडे अधिक गांभिर्याने पाहणे आवश्यक असून तसे न झाल्यास त्याचा विपरित परिणाम मानवजातीवर होणार आहे.

### पश्चिम घाटावर राक्षसी नजर!

पश्चिम घाट हा देशाच्यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून याठिकाणी जगातील अन्य कोणत्याही भागापेक्षा अधिक वन्यजीवसृष्टीची समृद्धता आहे. वन्यप्राणी, वनौषधी किंवा दुर्मीळ गोष्टींच्याबाबतीत हा भाग खूपच समृद्ध असून त्याच्यावर घाला घालण्याचे काम पद्धतशीरपणे सुरू आहे. मायनिंग लॉबीची त्यावर राक्षसी नजर गेली असून डोंगर पोखरण्याचे काम सुरू आहे. कोणतेही शासन असो मायनिंग लॉबीला समाधानी ठेवण्यासाठी काम करताना दिसत असून मायनिंगमुळे रोजगार मिळणार नसून रोजगार याठिकाणच्या समृद्ध निसर्ग सौंदर्यातून मिळणार आहे. पश्चिम घाट हा मायनिंग उद्योग रोजगार देणार नसून पर्यावरणातून प्रचंड रोजगार मिळणार आहे. शासन ह्या उद्योगातून व महसूल मिळणार, असे सांगत असले तरी ते साफ खोटे असून त्यातून पर्यावरणच नष्ट होणार आहे.

**मायनिंगमुळे पर्यावरणाचा ऱ्हास!**

### वर्षाकाठी १४ लाख हेक्टर जंगलतोड

उद्योगधंद्याबरोबरच शहरीकरणाच्या नावाखाली बेसुमार जंगलतोड होत असून त्यात दिवसेंदिवस वाढच होत आहे. बऱ्याचठिकाणी गरज नसतानाही जंगलतोड होत असून शासन त्याला परवानगी देऊन बक्षीस देत आहे. असा आरोप प्रा. बाचोळकर यांनी केला. वर्षाकाठी १४ लाख हेक्टर जमिनीवरील झाडांची कत्तल होत असल्याचे सांगितले.

### हत्ती पकड मोहीम चुकीची

रानटी हत्तीचा महाराष्ट्रातील कोल्हापूर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिरकाव झाल्यानंतर हत्ती नुकसान करतात अशी ओरड सुरू झाली. शेतकऱ्यांच्या नुकसानीमुळे शासनाने हत्ती बॅक टू होमसारख्या मोहिमा राबविल्या. यावर टीका करताना प्रा. बाचोळकर यांनी हतीचा अभ्यास न करता मोहिमा राबविणे चुकीचे आहे. त्याचा नैसर्गिक अधिवास कोठे होता? ते या ठिकाणी का आलेत? ते किती काळ राहू शकतात? याचा विचार न करता मोहिमा आखणे चुकीचे आहे. या एकूण प्रकाराचे गंभीर परिणाम भविष्यात पुढे येऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी हळबे कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, उद्योजक विवेक नाईक, सूर्यकांत परमेकर आदी उपस्थित होते.